## न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग भूम (न्यायालय क्र.२)

नि.फौज.खटला क्र.५४/२०१३
शासन वि. ईश्वर
**निशाणी क्र.१४०**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०७ चा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री.जे.जे.सरवदे यांचे मार्फत शपथेवर सुरु –**

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | :– | शशिकांत शिवाजी सवासे |
| माझे वय सुमारे | :– | ४६ वर्षे |
| माझा व्यवसाय | :– | नोकरी |
| माझे राहण्याचे ठिकाण | :– | बऱ्हाणपूर, ता.भूम, जि.उस्मानाबाद |

**०१.** दिनांक ०२.०७.२०१२ रोजी सकाळी ७.३० ते ८.०० चे दरम्यान मंदाकिनी नामदेव माने यांनी मला भांडण झाल्याची माहिती देऊन कैकाडी गल्ली भूम येथे बोलवून घेतले होते. मी व माझ्यासोबत सतीश भोळे तिथे गेल्यानंतर मंदाकिनी यांनी मला व पोलीसांना घटनास्थळ दाखवले. त्यांनी एक आरसीसी दोन मजली खाली दोन रुम व वरती दोन रुमची बिल्डींग दाखवली. तिथे रुममध्ये आस्ताव्यस्त सामान पडलेले होते. तिथे आमच्या समक्ष पोलीसांनी एक दगड जप्त केला. आता साक्षीदारला आर्टीकल ब वरील दगड दाखवण्यात आला असता त्यांनी तो ओळखला. पोलीसांनी आमच्या समक्ष पंचनामा लिहून दगड जप्त केला व पंचनाम्यावर आमच्या सहया घेतल्या. आता साक्षीदारला दिनांक ०२.०७.२०१२ रोजीचा घटनास्थळ तथा जप्ती पंचनामा दाखवण्यात आला असता त्यावर त्यांनी त्यांची सही ओळखली व मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगीतले. त्यास **निशानी १४१** देण्यात येते.

**०२.** त्यानंतर दिनांक ०८.०७.२०१२ रोजी भूम पोलीसांनी मला कैकाडी गल्ली येथे खोसे यांचे घरासमोर बोलावले होते. माझ्यासोबत सतीश भोळे होते. तिथे बबन दळवी यांनी घरातून एक काठी आणून पोलीसांना दिली व पोलीसांनी आमच्या समक्ष जप्त केली. ईश्वर खोसे यांनी घरातून काढून एक चाकू पोलीसांना दिले. पोलीसांनी सदर चाकू आमच्या समक्ष

जप्त केले. पोलीसांनी जप्ती पंचनामा आमच्या समक्ष लिहले व त्यावर आमची सही घेतली. आता साक्षीदारला दिनांक ०८.०७.२०१२ रोजीचा काठीचा जप्ती पंचनामा दाखवण्यात आला असता त्यावर त्यांनी त्यांची सही ओळखली व मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगीतले. त्यास **निशानी १४२** देण्यात येते. आता साक्षीदारला दिनांक ०८.०७.२०१२ रोजीचा चाकूचा जप्ती पंचनामा दाखवण्यात आला असता त्यावर त्यांनी त्यांची सही ओळखली व मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगीतले. त्यास **निशानी १४३** देण्यात येते. आता साक्षीदारला जप्त आर्टीकल अ वरील काठी व आर्टीकल क वरील चाकू दाखवण्यात आला असता त्यांनी ते ओळखले. बबन व ईश्वर खोसे यांना मी ओळखतो. ते आज न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञ श्री. एस.बी.हुंबे–**

**०३.** कुंडलिक माने माझे मेव्हणे आहेत. त्यांना माझी बहिण दिलेली आहे. २०१२ साली मी भूम येथे खाजगी नोकरी करत होतो. पंचनाम्याच्या दिवशी मी बाहेर कट्टयावर उभे राहून बिल्डींग पाहिलेली होती. पोलीसदेखील माझेसोबत कट्टयावर उभे होते. घरात आत कोण कोण होते हे मला माहित नाही. पंचनाम्याच्या दिवशी मंडळ अधिकारी किंवा नगर पालीकेचा कोणी अधिकारी आले होते किंवा कसे हे मी लक्ष दिले नाही. कोणते घर क्रमांकचा पंचनामा झाला हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, ईश्वर खोसे व नामदेव माने हे एकाच बिल्डींगमध्ये राहत होते. पहिल्या पंचनाम्याच्या दिवशी मी जेव्हा घटनास्थळवर गेलो तेव्हा दोन पोलीस माझे अगोदर उभे होते. मी गेल्यावर पंचनामा लिहण्यात आला होता. मी अंदाजे ७.२५ वाजता घटनास्थळवर गेलो होतो. हे मला आठवत नाही की, पंचनामा कोरे कागदावर लिहले होते की छापलेले कागदवर. दुसऱ्या पंचनाम्याच्या दिवशी पोलीसांनी मला फोन करुन घटनास्थळवर बोलवून घेतले होते. अंदाजे १.३० ते १.४५ वाजण्याचे सुमारास मी घटनास्थळवर गेलो. त्यावेळेस मी व सतीश भोळे तिथे होतो. आम्ही गेल्याचे १०–१५ मिनीटनंतर पोलीस घटनास्थळवर आले. मी भांडणमध्ये मध्यस्थी केली नाही.

**०४.** हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील पूर्ण मजकुर की, " दिनांक ०२.०७.२०१२ रोजी सकाळी ७.३० ते ८.०० चे दरम्यान मंदाकिनी नामदेव माने यांनी

मला भांडण झाल्याची माहिती देऊन कैकाडी गल्ली भूम येथे बोलवून घेतले होते. मी व माझ्यासोबत सतीश भोळे तिथे गेल्यानंतर मंदाकिनी यांनी मला व पोलीसांना घटनास्थळ दाखवले. त्यांनी एक आरसीसी दोन मजली खाली दोन रुम व वरती दोन रुमची बिल्डींग दाखवली. तिथे रुममध्ये आस्ताव्यस्त सामान पडलेले होते. तिथे आमच्या समक्ष पोलीसांनी एक दगड जप्त केला. आता साक्षीदारला आर्टीकल ब वरील दगड दाखवण्यात आला असता त्यांनी तो ओळखला. पोलीसांनी आमच्या समक्ष पंचनामा लिहून दगड जप्त केला व पंचनाम्यावर आमच्या सहया घेतल्या. त्यानंतर दिनांक ०८.०७.२०१२ रोजी भूम पोलीसांनी मला कैकाडी गल्ली येथे खोसे यांचे घरासमोर बोलावले होते. माझ्यासोबत सतीश भोळे होते. तिथे बबन दळवी यांनी घरातून एक काठी आणून पोलीसांना दिली व पोलीसांनी आमच्या समक्ष जप्त केली. ईश्वर खोसे यांनी घरातून काढून एक चाकू पोलीसांना दिले. पोलीसांनी सदर चाकू आमच्या समक्ष जप्त केले. पोलीसांनी जप्ती पंचनामा आमच्या समक्ष लिहले व त्यावर आमची सही घेतली" हे मी खोटे सांगीतले. हे म्हणणे खरे नाही की, जप्त झालेले दगड, काठी व चाकू ओळखल्याचे मी खोटे सांगीतले.

**०५.** हे म्हणणे खरे नाही की, नामदेवचा भाऊ कुंडलिक यांना माझी बहिण दिली असल्यामुळे नामदेव, कुंडलिक आणि राजेंद्र यांच्या सांगण्यावरुन मी आज रोजी खोटी साक्ष दिली.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

स्वाक्षरीत/-

दिनांक ०६.०३.२०२५

**( हुस्ना आर. खान )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,भूम.
(न्यायालय क्र.२)